महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

अमरावती विभागीय मंडळ अमरावती.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/परीक्षा 2147

दि. ०६/१०/२०२६

प्रति,

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती

विषय :- महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इ.५ वी व इ.८ वी साठी नव्याने प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्याच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज प्रक्रियेबाबत..

संदर्भ :- पत्र क्रं रा.म./मु.वि.मं./४०९८/पुणे दि.०१/१०/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इ.५ वी व इ.८ वी साठी नव्याने प्रविष्ठ होणा-या विदयार्थ्याच्या ऑनलाईन नावनोंदणी प्रवेश अर्ज प्रक्रियेबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

आपली विश्वासु

S. Salunke 06/10/2026

(संगीता साळुंके)

विभागीय सहा.सचिव

अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

सहपत्र :- रा.म. पुणे यांचे पत्र

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे

२)शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.

३)मुख्याध्यापक,सर्व मान्यताप्राप्त शाळा अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

harashtra State Board of
Open Schooling
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं.
८३२,फा.प्लॉ.नं.१७८,१७९,
बालचित्रवाणीशेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयुटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel.No. 020-25705122/25705140/25705000
Email - msbospune@gmail.com
Fax No. 020-25665807
website - msbos.mh-ssc.ac.in

क्र.रा.मं./मु.वि.मं./ 8०e८
पुणे ४११००४
दिनांक ०१/१०/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय: - महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इ. ५वी व इ. ८वीसाठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नांवनोंदणी प्रवेश अर्ज प्रक्रियेबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इ. ५वी व इ. ८वीसाठी नव्याने प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन पध्दतीने नांव नोंदणी प्रवेश अर्ज दि. ०५/१०/२०२६ पासून दि. २१/१०/२०२६ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) या कालावाधीत स्विकारण्यात येणार आहेत.

उपरोक्त ऑनलाईन अर्ज भरण्याचा व कागदपत्रे स्विकारण्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	ऑनलाईन पध्दतीने नांवनोंदणी अर्ज स्विकारण्याचा दिनांक	तपशील
१	दि.०५/१०/२०२६ ते दि. २१/१०/२०२६ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत)	विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नांवनोंदणी अर्ज भरणे
२	दि. २२/१०/२०२६ ते दि. ३०/१०/२०२६	विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये जमा करणे.
३	दि. ०२/११/२०२६	संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे

तरी उपरोक्त तक्त्यात नमूद कालावधीमध्ये ऑनलाईन नाव नोंदणी करणेबाबत आपल्या विभागीय मंडळाच्या अधिनस्त संबंधित संपर्क केंद्रशाळा प्रमुख/मुख्याध्यापक यांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा. **तसेच आपल्या विभागीय मंडळात राज्य मुक्त विद्यालय मंडळाचे कामकाज पहाणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याचे नांव,पद व भ्रमणध्वनी क्रमांक या कार्यालयास त्वरीत अवगत करावा.**

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.